म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २४६५



# पंचरंग

REFBK-0023638
REFBK-0023638

डॉ. वसंत पटवर्धन

। पंचरंग । डॉ. वसंत पटवर्धन ।





मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ३०

REFBK-0023638
REFBK-0023638

# पंचरंग

डॉ. वसंत पटवर्धन



मुद्रक
चिंतामणी सदाशिव लाटकर
कल्पना मुद्रणालय
शिव-पार्वती
टिळक रोड, पुणे ३०

प्रकाशक
अनिल मेहता
मेहता पब्लिशिंग हाऊस
'धनश्री' अपार्टमेंटस्
१२१६ सदाशिव पेठ
पुणे ३०

मुखपृष्ठ व सजावट
अनंत सालकर

© प्रसन्ना पटवर्धन

मूल्य २५ रुपये



# प्र स्ता व ना

संस्कृतातील अभिजात साहित्याची थोरवी अशी आहे की, गेली अनेक शतके त्यांनी रसिकांना अलौकिक आनंद दिला आहे. या आनंदाबरोबरच या साहित्याने रसिकांची सौंदर्यदृष्टी घडविली आहे, त्यांच्या भावनांचे पोषण केले आहे आणि भारतीय समाजाच्या जीवनदृष्टीवरही स्वतःचा ठसा उमटविला आहे. या रसिकांपैकी जे स्वतः कलावंत होते त्यांची मने नुसता आस्वाद घेऊन थांबली नाहीत तर तेच विषय घेऊन, नटवून सजवून त्यांनी वेगवेगळ्या माध्यमांतून आपापल्या कलाकृती निर्माण केल्या. साहित्यातल्या विषयांनी चित्र शिल्प, नृत्य यांचेही लक्ष वेधून घेतले आणि प्रत्येक माध्यमात या साहित्या-पण अनुभव–अभिव्यक्तीची बहुरंगी परंपराच निर्माण झाली. ही परंपरा ात वर चालूच आहे. त्यापैकी काही कथाभागांना तर 'मिथ'चेच स्वरूप प्राप्त झाले आहे. अजूनही रामकथा विविध रूपांत पुन्हा पुन्हा अवतरताना दिसते, शाकुंतल आजही वेगळ्या पद्धतीने बसविण्याचे प्रयोग होतात, त्या विषयावर चित्रपट निघतो, नृत्य बसविले जाते किंवा गीत शाकुंतल स्वरूपात ते भाव-गीताच्या पद्धतीने सादर केले जाते.

श्री. वसंत पटवर्धन यांच्या ह्या 'पंचरंग' संग्रहातील 'गीतमेघ', 'कुमारसंभव' आणि 'सरली न कूजिते सरली सारी रजनी' ही कालिदासाच्या 'मेघदूत'. 'कुमारसंभव' आणि भवभूतीच्या 'उत्तररामचरित' यांवर आधारलेली काव्ये त्या परंपरेची अखंडता दर्शविणारीच उदाहरणे आहेत. 'पंचरंग'मधल्या उरलेल्या भागात समाविष्ट असलेली काही ऋतुवर्णने स्वतंत्र असली तरी ती अनेक ठिकाणी संस्कृत साहित्यातील कलादृष्टीनेच संस्कारित झालेली आहेत असे आढळून येते.

या वाङ्मयीन परंपरेच्या परिचित आधारभूमीवर उभारणारा पण स्वतःचे वेगळेपणही घेऊन आलेला 'पंचरंग' हा संग्रह आहे.

कालिदासाच्या साहित्यकृतीमध्ये शाकुन्तल आणि मेघदूत या दोन कला-कृतींची लोकप्रियता सर्वाधिक आहे. आजवर दोन्हींची मराठीत अनेक भाषांतरे झाली. मेघदूताचे एक भाषांतर श्री. वसंत पटवर्धन यांनीही पूर्वी केले आणि

त्याच्या दोन आवृत्त्याही निघाल्या आहेत. परंतु एवढ्याने पटवर्धनांच्या मनाची तृप्ती झाली नाही, तो विषय आणखी वेगळ्या तऱ्हेने त्यांच्या मनाला आवाहन करीत राहिला; आणि त्यातूनच पंचरंगमधील ' गीतमेघ ' या काव्याची निर्मिती झाली. या काव्यात मेघदूताचा आशय गायनानुकूल अशा विविध वृत्तांतल्या नऊ गीतांतून प्रकटला आहे. हे नवे रूप धारण करताना मेघदूताचे मूळचे स्वरूप अपरिहार्यपणेच बदलत गेले. यक्षाकडून कोणती आगळीक घडली हे मूळ मेघदूतात मोघम ठेवले आहे. पटवर्धनांनी कल्पकतेने स्वतःची भर घालून यक्षाची आगळीक सांगितली, ती चांगली वाटते. मेघदूतात प्रारंभीचे पाच श्लोक सोडले तर सर्व काव्याचे निवेदन विरही यक्षाच्या मुखानेच घडते. त्यामुळे निवेदनाला एक प्रकारची सलगता येते. त्यातले सर्व बोलणे, सर्व वर्णने ही यक्षाच्या विरहव्यथित आणि प्रणयातुर मनाने तसेच गतसुखांच्या आठवणींनी रंगलेली आहेत. यक्षाचे धूम्रबाष्पमय, निर्जीव अशा मेघाला उद्देशून बोलणे, त्याला आपली मनोव्यथा सांगणे आणि त्याला सखीकडे निरोप घेऊन जाण्यास विनविणे हे यक्षाच्या विरही स्थितीची भावोत्कटता दर्शविणारे घटकच आहेत. त्यामुळे मेघदूत वाचताना मनावर दाटत राहतात ते यक्षाच्या मनाचे भावतरंग; आणि ते भावतरंग सूक्ष्मपणे टिपून व्यक्तविणारे कालिदास प्रतिभेचे ललित–विलास जे बघून मन स्तिमित होत राहते.

मेघदूतात यक्षच सारखा डोळ्यांसमोर उभा राहतो. तो मेघाशी बोलतो आहे यामुळे मेघ डोळ्यांसमोर उभा राहात असला तरी मेघाला त्यात स्वतंत्र अस्तित्व नाही. स्वतंत्रपणे मेघाची भावना किंवा मेघाचे उत्तर तेथे येत नाही. तसेच यक्ष आपल्या पत्नीचे वर्णन करीत असला तरी ती यक्षपत्नीही आपल्या समोर येत नाही. पण पटवर्धनांच्या गीतमेघात यक्ष, कुबेर, मेघ, यक्षपत्नी यांच्या तोंडी स्वतंत्र गीते असल्याने त्या व्यक्तींना एक ठळकपणा येतो. साहजिकच मेघदूतात यक्षाला असलेले प्राधान्य येथे आपोआपच अनेक पात्रांमध्ये वाटले जाते. यामुळे मेघदूताचा सलग परिणाम आणि गीतमेघाचा सलग परिणाम यांत फरक होणे अटळच ठरते. परंतु अशा प्रकारची नाट्यात्मकता आणताना मुळातील तपशील आणि भाव ही दोन्ही आपल्या गीतात येतील याची काळजी पटवर्धनांनी घेतलेली आहे. कौशल्याने मुळातील आशयाला ' ध्रुपद–अंतरा ' या रचनेचा गीताकार दिला आहे. मोराची पिले ही जशी मोराच्या खाणाखुणा घेऊन येतात त्याप्रमाणे ही गीते सुटी वाचताना ती मेघदूताचीच अपत्ये आहे हे जाणवत असते. म्हणजे मुळातले वातावरण त्या वातावरणाने सूचित होणारे भाव आणि सर्वाला व्यापणारी विरहभावना या गोष्टी रूपान्तरात चांगल्या आल्या आहेत. दीर्घ काव्याचे हे भावगीतात्मक ' रूपांतर '

असल्याने मुळातल्या मंदाक्रान्तेतील ओळी वेगळ्या आकारात, वेगळ्या रूपात येतात. उदा —

> मेघालोके भवति सुखिनोऽप्यन्यथावृत्तिचेतः
> कण्ठाश्लेषप्रणयिनि जने किं पुनर्दूरसंस्थे ॥

या सुप्रसिद्ध पंक्ती

> ‘ तुला पाहुनी सुखासीनही
> कातर होती, होती विरही
> कथा काय मग कंठमिठीचा प्रिय ज्यांचा तुटला ’

या स्वरूपात येतात आणि ‘ कनकवलयभ्रंशरिक्तप्रकोष्ठः ’ मधील आशय

> “ हातामधले हेमवलय हे
> सखिविरहाने गळते आहे
> पुन्हा पुन्हा मज शाप आठवे धनाधिपे जो दिला ’

या स्वरूपात विशद होऊन गीताचा उत्कर्ष साधण्यासाठी गीताच्या अखेरच्या कडव्यात येतो.

एकूण नऊ गीतांमध्ये यक्षाचे मनोगत व्यक्त करणाऱ्या गीतांची संख्या …म्म्याहून अधिक म्हणजे पाच असल्याने आणि इतर वव्हंश गीते …ा उद्देशून वा त्याच्याविषयीची असल्याने यक्षच सारखा काव्याच्या केंद्र-…आहे असेही भासत राहते. त्याचे वास्तव्य उंच रामगिरीवर आहे. मे… प्रवास त्याहीपेक्षा उंच असणाऱ्या आकाशातून होणार आहे याचे भान ठेवून कालिदासाने यक्षाच्या मुखातून त्याच्या प्रवासाचे वर्णन केलेले आहे. त्यामुळे मेघदूत वाचताना आपणही अशाच उंचावरून आसमंत अवलोकन करीत आहोत आणि त्याचबरोबर मेघाच्या गतीने पुढे पुढे सरकत आहोत हा अनुभव येत राहतो. ही उंचीची व गतीची जाणीव कालिदासाने त्याच्या सहज अवधानाने चितारलेली आहे. मंदाक्रांता वृत्ताची लय ही या गतीस पोषकच ठरते. रंगांची योजना वा उल्लेख कालिदास फार कौशल्याने करतो. ‘ पूर्व मेघा ’त नील-कृष्ण-धवल रंगाच्या सौम्य छटा प्रामुख्याने येतात आणि अलकेच्या वर्णनात विविध छटांच्या झळझळीत रंगाबरोबर नादगंधाच्या संवेदनासंबंधी कालिदास जागरूक दिसतो. चित्रणे जिवंत होतील व त्यातून भावही सूचित होतील ही वर्णनाची किमया कालिदासाला साधलेली आहे. वरील सर्व गोष्टी ‘ गीतमेघात ’ येणे कठीणच होते. परंतु यांपैकी गतीचे भान चांगले व्यक्त झाले असून मुळातली प्रवासाची गतिमानता इथेही कायम राहिली आहे. उदा. ‘ काय दिसावे ठायी ठायी मार्ग कठिण कापता ’ या गीतात एकेका नदीचा प्रदेश झपझप ओलांडून गीताचा आशय पुढे सरकतो. आणि गीताच्या शेवटी

गंगेचा उल्लेख येऊन ' जा कैलासा, पथ हा आक्रमिता ' येथपर्यंत आपण येऊन पोचतो. याच पद्धतीने ' श्रमता मार्गी विश्रामांची विसरु नको स्थाने ' असे म्हणत आम्रकूट, दशार्णदेश, उज्जयिनी, बाणवन, कुरुक्षेत्र असे उल्लेख करीत ' हिमालयी जा, कनखलशैली मग कैलासाला ' या रीतीने पुन्हा कैलासापर्यंत प्रदेश दाखविला जातो आणि याच बिंदूवरून ' नजर टाक तू तिथून अलका बघ आनंदाने' अशी अलका दाखविली जाते. पटवर्धनांच्या चित्रणात रंगच्छटा मात्र उणावतात किंवा काही ठिकाणी उल्लेखाने त्या येऊनही हवा तो परिणाम साधत नाहीत, असे वाटते. याला काही अपवादही आहेत.

पाचूत बांधलेली वापीत पायरी ती
जणू पुष्कराज देठी, पद्मे सुवर्ण फुलती
क्रीडानगास नीळ जो हेमकर्दळीत

अशा ओळींतील विविध रंग डोळ्यांना जाणवून जातात.

कुमारसंभवाची कथा ही अनेक वळणांची आहे. ब्रह्मदेवाच्या वराने तारकासुर उन्मत्त होतो, देवांवर आपत्ती कोसळतात, शंकर-पार्वतीचे लग्न होऊन त्यांना होणारा पुत्र तारकासुरास मारील असे ब्रह्मदेव सांगतो. शंकराच्या मना पार्वतीविषयी आसक्ती निर्माण व्हावी यासाठी मदनाची योजना केली ज शंकर मदनाला जाळून टाकतो, रती मदनासाठी विलाप करते, पार्वती प्राप्तीसाठी कठोर तप करते, शंकर तिच्या मनाची परीक्षा बघतो, शंकर ळतो व विवाहोत्सुक असल्याचे बघून ती शंकराला आपला पिता हिमाल ची संमती घेण्यास सांगते, लग्न ठरते, शंकर हिमालयाच्या राजधानीस लवाजम्यासह येतात, लग्न पार पडते. नंतर पुत्रप्राप्ती होऊन तारकासुराचा यथाकाल वध होतो असा त्या कथेचा एकूण विस्तार आहे. या कथेचा संक्षेप पटवर्धनांनी फक्त सहा गीतांत केला आहे. या गीतांच्या जोडीस निवेदकाच्या तोंडी घातलेली सहा पद्यांतली निवेदने आहेत. तारकासुराकडून होणाऱ्या त्रासाच्या निवारणार्थ देवांनी ब्रह्मदेवाकडे घेतलेली धाव, मदनाने शंकराच्या मनात प्रेमविकार निर्माण करण्यासाठी केलेला प्रयत्न, त्याचे शंकराकडून झालेले दहन, पार्वतीचे तप, शंकरपार्वतीच्या लग्नाचा सोहळा हे प्रसंग पटवर्धनांनी निवेदनात मिसळून टाकले आहेत. यांतल्या एखाद दुसऱ्या प्रसंगाचे स्वतंत्र गीत तयार झाले असते तर या संगीतिकेस अधिक भरीवपणा आला असता. हे काव्य ' गीतमेघ ' आणि ' सरली न कूजिते ' यांच्या तुलनेने संक्षिप्त झाले आहे.

गीतांतून तारक, रती, पार्वती व शंकर या कुमारसंभवातल्या चार व्यक्ती वेगळेपणाने दिसून जातात. तारकाचा उन्मत्तपणा काहीसा एकसुरी आहे, पण भयानकतेचे वातावरण निर्माण करून जातो. रतीच्या विलापाचे गीत, मदनाच्या

मृत्यूमुळे होणाऱ्या तिच्या दुःखाचे, तिच्या प्रेमाच्या उत्कटतेचे दर्शन घडणारे आहे.

तुज नावडते ते कधी न मी आचरिले
जे अप्रिय मज ते तू न मनी आणियले
मग दर्शन-दुर्लभ का रे कारण नसता ?

पण या हताश प्रश्नाला उत्तर नसतेच.

अपुरेच रंगले होते पाउल डावे
तरि ओढुन तुजला नेले निष्ठुर दैवे
ते रंगविण्यास्तव तरी पुन्हा ये आता !

या काव्यमय ओळी उधळलेल्या संसाराचे दुःख आणि मनात उरलेली आशा आणि ओढ यांचे आविष्करण उत्कटतेने करतात. मेघदूत, कुमारसंभव आणि सरली न कूजिते या तीनही काव्यांत आशयाच्या दृष्टीने विरह, ताटातूट या रूपाने येणारा कारुण्याचा एक धागा आहे. यक्षाच्या विरहात कारुण्य आहे राम-सीतेच्या ताटातुटीत कारुण्य आहे, रतीच्या विलापात कारुण्य आहे. तिन्हीतील कारुण्याची जात आणि तीव्रता अर्थातच वेगवेगळ्या प्रकारची आहे. पण कारुण्याचा धागा असूनही कुमारसंभवाचा थाट अगदी वेगळा आहे. त्यात विविध रस येतात. प्रारंभ रौद्र स्वरूपात होतो, तर शेवट आनंदात होतो. पार्वतीच्या प्रेमाची परीक्षा पाहण्यासाठी शंकर ब्रह्मचाऱ्याच्या रूपात येतो हा प्रसंग चांगलाच नाट्यपूर्ण आहे आणि हास्यविनोदाला वाव देणारा आहे. शंकर तुला साजेसा नाही हे वेषांतर केलेला शंकरच पार्वतीला सांगत असतो—

तुझिया हाती रत्नकंकणे
तो तर मिरवी भुजगभूषणे
करात त्याच्या कर देताना थरथरशील अंतरी।

असा त्या दोघांतला विरोध स्पष्ट करून तो तिला भीती घातल्यासारखे सांगतो—

तुझिया गात्री उटी सुगंधित
भस्माचे तो त्रिपुंड्र लावित
उमे, उधळणे भस्म उचित का तुझ्या उरोजांवरी ?

यात विनोदाची झुळूक आहे आणि त्याचबरोबर पार्वतीला त्याही स्थितीत शंकर किती बारकाईने न्याहाळतो आहे याचेही दर्शन आहे. पार्वतीला पाहताना त्याच्या मनात काय चालले आहे याची पुसटशी सूचनाही यातून मिळते. शंकर-पार्वतीच्या या खेळकर नात्यामुळे काव्याला वेगळी गोडी प्राप्त झालेली आहे.

पटवर्धनांनी रचलेल्या शंकर आणि पार्वती यांच्या गीतांतून त्या दोघांच्या परस्परांबद्दलच्या भावनाही चांगल्या तऱ्हेने मनावर ठसतात. शंकराला पार्वतीची किती ओढ व काळजीही वाटते हे,

'जपतप करुनी नको कष्टवू कृश या कायेस
झालो उमे, तुझा दास'

या गीतात चांगल्या तऱ्हेने स्पष्ट होते—

केसांमधुनी गळल्या पर्णे
तुझी दुखावी तनू अपर्णे
तिला स्थंडिली टेवुनि निद्रा सुखे घेतलीस।
झालो उमे, तुझा दास॥

या ओळींतून शंकराच्या मनात असलेली पार्वतीच्या कोमलतेची, तिच्या तपाच्या उग्रतेची व त्यातून दिसून येणाऱ्या तिच्या प्रेमाच्या उत्कटतेची जाण चांगल्या तऱ्हेने व्यक्त होते.

ह्या भेटीच्या प्रसंगात पार्वतीने ब्रह्मचाऱ्याच्या रूपाने आलेल्या शंकराला ओळखले नव्हते. शंकराची निर्भर्त्सना ऐकताच

रत्नकंकणे करात वा भुजंग-वेष्टणे
मजसि सर्व सारखे शंकराविना उणे

असे तिने त्या ब्रह्मचाऱ्याला ठणकावून सांगितले आहे; शिवाय वर बजावले की, 'मी माझे तप अजाणता करीत नाही, मी काय करते आहे ते माझे मला नीट माहीत आहे.' या उद्गारांनीच पार्वती ही पार्वती म्हणून मनावर ठसते. पुढे ब्रह्मचारी हा शंकरच आहे हे ध्यानात येताच त्या चमत्काराने ती गोंधळली, अनावर हर्षितही झाली. किती आणि कशी ?

पुढे जाऊ न शकली
पाय तिथे न थांबले

या दोन साध्या ओळींत तिच्या मनाचे चित्रण पटवर्धनांनी सुंदरपणे व्यक्त केले आहे.

'सरली न कूजिते सरली सारी रजनी' हे उत्तररामचरिताच्या पहिल्या अंकावर आधारलेले गीतनाट्य आहे. निवडक प्रसंग घेऊन त्याचे एकेक गीत करणे या पद्धतीने हे रूपांतर केलेले नाही. ध्रुवपद असलेली काही मोजकी तीन-चार गीतेही यात आहेत. तरीही कुठल्या एका फॉर्ममध्ये ही रचना बंदिस्त होऊ शकलेली नाही. ती तिच्या आशयाच्या गतीने मार्ग शोधीत गेलेली आहे आणि त्यातून तिला तिचा एक सलग आकार प्राप्त झालेला आहे. नटी-सूत्रधार प्रारंभी येतात आणि काहीतरी सांगू बघतात पण,

'आपण जाऊ पडद्यामागे
रसिकांच्या पडू द्यावी कानी
भवभूतीचा लक्ष्मण करि जी
श्रीरामाला सौम्य विनवणी—

असे म्हणून ते लगेच पडद्यामागेही जातात. त्यामुळे नाट्याला एकदम सुरुवात होते. लागलीच गती घेऊन त्याचा प्रवाह अप्रतिहत वाहात राहतो.

रावणाचा वध करून राम-सीता अयोध्येस येऊन संसार करू लागले; वनवासात त्यांच्या आयुष्यात जे प्रसंग घडले त्यावर चित्रकाराने काढलेली चित्रे पाहण्यासाठी लक्ष्मणाने त्यांना एका महालात आणलेले आहे. रामसीता विवाहाच्या प्रसंगापासून पुढच्या, पण आता भूतकाळात विलीन झालेल्या आयुष्यातील काही प्रसंगांवर चित्रे काढून झाली आहेत आणि बाकीची अजून होणार आहेत. या चित्रांना जोडूनच ती पाहताना राम सीतेशी जे काही वागणार आहे त्याचेही चित्र आपल्यासमोर आपोआपच उभे राहणार आहे. चित्रे बघण्याची सर्वांनाच उत्सुकता आहे. रावणवधानंतर सीतेचा स्वीकार करण्यापूर्वी सीतेची अग्निपरीक्षा झाली, नेमकी याच क्षणापाशी येऊन ती चित्रे थांबली आहेत. येथपर्यंतचीच चित्रे पूर्ण व्हावीत हेही नाट्यपूर्ण आहे. ही भूतकालीन चित्रे बघता बघताच त्यांच्या मनात काही सुखाचे पण अनेक दुःखाचे प्रसंग जागे होणारच आहेत. हेही वर्तमानकाळातील एक चित्र असणार आहे. पंचवटीतील वास्तव्याची चित्रे बघताना सीतेच्या मनात पुन्हा वनात जाण्याचे डोहाळे निर्माण होतात आणि दुर्दैवाने याच वेळी सीतेसंबंधी लोक वाईट कुजबुजतात, ही वार्ता प्रतिहारी रामाला सांगतो. सगळी चित्रे पाहात असताना स्वप्नसृष्टीत दिसावा तशा भूतकाळात ते रमलेले असतात पण यालाच जोडून भीषण वास्तव येते. एखाद्या हरिणीला दुर्दैवाने जाळ्याच्या दिशेचीच ओढ लागावी तशी ओढ सीतेच्या मनात निर्माण होते. भवितव्यता कशी अटळ असते याचा अनुभव येथे यायला लागतो. रसिकाच्या मनावरचा ताण इथून पुढे वाढत जातो. रामाने सीतेला न कळविता तिच्या त्यागाचा निर्णय घेतलेला. रथातून सीता वनवासाला निघाली ती अज्ञानातच. कशासाठी रथ सिद्ध झाला आणि कशासाठी त्याचा उपयोग झाला! हा दैवदुर्विलास पाहून आपण हळहळतो. हा सारा कथाभाग पटवर्धनांच्या गीतमय नाट्यरूपांतरात त्याच्या कथात्मक व भावनात्मक वळणांसकट, त्यातील उत्कटतेसह चांगल्या तऱ्हेने आला आहे. मुळातील विस्तृत तपशिलाचा संक्षेप पटवर्धनांनी नेमकेपणाने केला आहे लेखन अनेक अर्थछटा सुचवीत जाते आणि त्यातून अर्थ सखोल होत जातो. लक्ष्मण चित्र दाखविण्यासाठी बोलू लागतो तेथपासून मनावर जी पकड निर्माण होते

ती वाढत्या भराने अखेरपर्यंत टिकते. या रचनेत ‘ अविदितगतयामा रात्रिरेव व्यरंसित । ’ या सुप्रसिद्ध ओळीचे ‘ सरली न कूजिते; सरली सारी रजनी ’ असे मोहक रूपांतर केले असून त्याचा त्यांनी आपल्या गीतनाट्यात चतुराईने उपयोग करून घेतला आहे. काव्याचा शेवट करताना

कूजिते न सरली । जरी त्या सरल्या रात्री सदा
विरहार्ता सीता । एकटी आज पुन्हा एकदा

असे त्या चरणाचे स्मरण करून देऊन सीतेस अधिकच एकटी सोडली आहे. काव्यदृष्ट्या योग्य अशा उत्कर्षबिंदूवर हे नाट्य संपते.

यात लक्ष्मण, राम आणि सीता यांची एकमेकांपासून अगदी वेगळी असलेली व्यक्तिमत्त्वे पाहावयास मिळतात. पंचरंग संग्रहातल्या तीन्ही काव्यांत व्यक्ति-मनाच्या दर्शनाच्या दृष्टीने हे काव्य सरस ठरते. येथे एकेका चित्राचे दर्शन हीच एक घटना आहे. ती जुन्या अनुभव मनात जागा करते आणि या क्षणाशी त्यांचा संघर्ष वा संमीलन होते. लक्ष्मण फार सरळपणे चित्र दाखवीत जातो, पण नको त्या आठवणी उठावाने येतात. पहिलेच चित्र सर्वांच्या मनावर आघात करणारे. रावणवधानंतरच्या सीताशुद्धीच्या प्रसंगाचे. सतीसाध्वींवर अशा वेळा का येतात हा त्याचा प्रश्न ! प्रश्न सहजपणे मनात येणारा, त्याला स्वतःला शोकाकुल करणारा, सीतेविषयी कणव निर्माण करणारा, रामाला खोलवर छेडणारा आणि सीतेला केवळ असह्य असा. ‘ जी शुद्ध जन्मतः त्यांची कसली शुद्धी ’ असे म्हणत राम शुद्धीचा प्रसंग बाजूस सारू बघतो, पण त्याबरोबरच ‘ तुज कसे सांगणे यज्ञसंभवा सीते । जननिंदा तुजला सदैव लिपटू बघते ।’ ही खंत बोलतोच आणि ‘ लोक असे का वागतात कळत नाही ! ’ असे म्हणतो. सीतेच्या मनाने या प्रसंगाची खोलवर धास्तीच घेतलेली असणार ! ती समजुतीच्या स्वरात विषयान्तर करीत ‘ पुरे विषय तो नाथा आता चला पाहु या तुमच्या चरिता ’ असे म्हणत पुढे चालते. अशा एका प्रसंगातच तिघांच्या मनाचे वेगवेगळे पैलू स्पष्ट होतात. एखादे सुखद स्मृतींचे चित्र दाखवून झाले की लक्ष्मण पुन्हा कधी मंथरेच्या, तर कधी शूर्पणखेच्या चित्राशी येऊन थांबतो. ‘ आठव त्यांचा नको ’ ही सीतेची धास्तीची प्रतिक्रिया; तर ‘ प्रिय तिचे काय नच, विरह वगळुनी मजला ’ ही रामाची भावना. पण शेवटी सीतात्यागाचा निर्णय तो घेतोच—डोहाळे पुरविण्यासाठी आपण वनात चाललो आहोत या भाबड्या आनंदात रथात बसून चाललेली सीतामात्र रामाचे स्मरण करून ‘ आशिर्वच त्यांचे असावे या सीतेपाठी ’ असे म्हणत मनातल्या मनात रामाला नमस्कार करीत रथात चढते. तिच्या मनात दुःख एकच असते—

दुःख एक सलते । बरोबर असती नच राघव।
संगतीस आता । केवळ पूर्वीचा आठव।

परस्परांना कलात्मक उठाव देणाऱ्या व्यक्तिप्रसंगाच्या गुंफणीतून या नाट्यानुभवाचा उत्कर्ष साधला जातो. ही रचना सहजपणे स्वतःचा आकार शोधीत जाते. नटी-सूत्रधाराचे संभाषण सोडले तर भाषेचा ओघही सहजपणे आशयानुकूल असा राहिला आहे.

'पंचरंग'मधील आणखी दोन भाग हे ऋतुवर्णने आणि स्फुट कवितांचे आहेत. पहिल्या तीन रूपांतरांप्रमाणे आणखी एखाद्या रूपांतराची भर घालून हे पुस्तक पुरे झाले असते तर त्याला एकसंधीपणा प्राप्त झाला असता असे वाटल्यावाचून राहत नाही. ऋतुवर्णनात वसंत ते शिशिर असे एक ऋतुचक्र येते व पुन्हा वसंत – शरदावरल्या कविता येतात. या कविता अनुभवाच्या पातळीवर न जाता वर्णनाच्या पातळीवर राहतात; त्यातही संस्कृतातल्या सांकेतिक प्रतिमा आल्याने जिवंतपणाला बाधा येते. शैली संस्कृत शब्दांनी बोजड बनते. काही वेळेला चित्रण स्थूल स्वरूपाचे बनते. मात्र यातले ग्रीष्माचे वर्णन काहीसे वेगळ्या रीतीने आणि सांकेतिक वाटा सोडून झालेले आहे, त्यामुळे ते लक्ष वेधून घेते.

नसे कोठे तृणपाते । आग ओकते आकाश
नसे सावली आसऱ्या । मन उदास निराश
सुख सावली होऊन । गेली वसंताच्या मागे

या वर्णनातून एक भावावस्थाही सांगितली जाते, त्यामुळे ग्रीष्माला केवळ वर्णनापलीकडचा भावार्थ प्राप्त होत जातो. अशीच शिशिरावरली कविताही उल्लेखनीय आहे.

'जाणीव हो जरेची वृक्षावरील पाना ।
शिशिरास हुंदका ये ऋतुचक्र संपताना'

यातली हुंदक्याची कल्पना नावीन्य व बहर संपल्याची निदर्शक म्हणून लक्षात राहून जाणारी आहे.

'तुष्ट झाल्या पुष्कळेचे हे सुखाचे चांदणे'

या ओळीने सुरू होणारी शरदावरली कविता शरदाचे वातावरण मनात जागे करते. अशा काही कविता व काही कडवी ही या विभागातली जमेची बाजू.

इतर स्फुट कविता सरमिसळीच्या आहेत. 'अंतरीचे सल'सारखी एखादी दुसरी प्रेमकविता, काही चमकदार कल्पना असलेल्या कणिका, 'ससेनाना कोल्हेबाबा काय झाल्या गप्पा?' अशी बालांसाठी लिहिलेली कविता या वाचनीय आहेत. पटवर्धन किती विविध प्रकारची कविता लिहितात याची कल्पना

या कवितांवरून जरूर येते.

ही लांबलेली प्रस्तावना आवरताना या सर्व पुस्तकास लागू असणाऱ्या काही महत्त्वाच्या मुद्द्यांचा उल्लेख करायला हवा. या संग्रहातील गीतांचा आणि कवितांचा आविष्कार हा विविध प्रकारच्या वृत्तांमधून झालेला आहे. आजकाल मराठीतली बहुतेक कविता मुक्तछंदातूनच लिहिली जात असल्यामुळे इतक्या विविध वृत्तांची योजना असलेला संग्रह पाहून मला प्रारंभी थोडा विस्मयच वाटला. रचनात जाती, छंद आणि काही वृत्ते यांचा समावेश आहे. केशवकरणीचे ध्रुवपद आणि अंतरा पादाकुलकाचा, माधवकरणीचे ध्रुवपद आणि अंतरा चंद्रकांत–साकी यांच्यासारखा किंवा पादाकुलकाचा अशी मजेशीर मिश्रणे आढळली. याशिवाय रसना, धवलचंद्रिका, भूपती, दिंडी, आदी जातींचा उपयोग केलेला आहे. काही ठिकाणी वृत्तरचना सैल होते, तसेच सव्वीस मात्रांच्या सत्तावीस वा अठ्ठावीस होत जातात असेही आढळून येते. हे दोष सहजपणे काढून टाकता आले असते असे आहेत. परंतु प्रसंगाला व भावनेला अनुकूल वृत्त योजण्याचे कसब, वृत्तांची आंदोलने ओळखणारे मन व कान पटवर्धनांजवळ आहेत ह्यात शंका नाही. त्यातच पटवर्धनांनी हा सारा आविष्कार अतिशय सफाईदार भाषेत केलेला आहे. कधी भाषेच्या साध्या पोताशी न जुळणाऱ्या अवजड संस्कृत शब्दांनी, तिचे पोत विषम होते; व–ती रचना खटकते. परंतु एकंदर अनुभव येतो तो सफाईदार भाषेचा. साहजिकच आजची सैल, स्वैर, मुक्त रचना वाचायला सरावलेल्या वाचकाचे मन थोडेसे जुन्या कालखंडातही जाऊन येते.

मेघदूत, कुमारसंभव आणि उत्तररामचरित या तिन्हींच्या रूपांतरात आविष्काराच्या दृष्टीने विविधता आली आहे. ( काव्यप्रकाराच्या दृष्टीने हे तीन प्रकार संमिश्र स्वरूपाचे, भावकवितेपेक्षा वेगळे असे आहेतच ). यातले गीतमेघ गीतगायनाच्या पातळीवर राहते. कुमारसंभव हे गीतगायनाबरोबरच, ( एका गीताचा अपवाद सोडता ) नृत्याभिनयातूनही व्यक्त होऊ शकेल अशा शक्यतांच्या जागा दाखवून जाते, आणि उत्तररामचरित हे गीत-नाट्य पद्धतीने सादर करता येण्यासारखे आहे. त्याच्या अनुभवाविष्करणात अभिनयानुकूलता नाट्यमयता सर्वत्र आहे. यामुळेच कुमारसंभवाचे प्रारंभिक निवेदन संपल्याबरोबर मृदंगावर थाप पडेल व रंगमंचावर उद्दाम नृत्य करीत तारकासुर अवतरेल असे वाटते. ते गीत गायिले जात असतानाच त्या शब्दार्थातून तारकासुराचा अभिनय दिसत राहतो. इतर गीतेही अशीच मुद्राभिनय दर्शविणारी आहेत; निवेदकाचे निवेदनही त्यात मिसळून जावे अशाच पद्धतीने लिहिले गेले आहे. हे जे चैतन्य या लेखनात उतरले आहे त्याचे श्रेय पटवर्धनांच्या

कलादृष्टीला द्यायला हवे.

ही प्रस्तावना लिहीत असताना माझ्या डोळ्यांसमोर अनेकदा येत होते ते तीस वर्षांपूर्वी पुण्याला एस. पी. कॉलेजच्या आसपास, टिळक रोडवर, आपोआप एकत्र जमलेल्या साहित्यप्रेमी तरुणांच्या घोळक्यात किती सांगू – किती नको अशा उच्चंबळीने बोलणारे, १९५१–५२ सालातले पटवर्धन. त्यांच्या त्या बोलण्यात अगदी ताज्या कथा–कविता–कादंबऱ्यांचे विषय होते. कुठल्या मासिकात काय छापून आले, काय आवडले – काय नाही यासंबंधी अगदी मनमोकळे बोलणे होते; साहित्यातील घडामोडी-विषयींचे अगत्य होते. आठवड्या भरात पुन्हा कधी तरी असाच घोळका जमे, हातातल्या सायकलींचे टेबल तयार होई, सिटांवर कोपर टेकवून गप्पांना सुरूवात होई, काय नवे वाचले ते एकमेकांना सांगितले जाई. पटवर्धन वाचलेल्या कवितांच्या ओळी भराभर म्हणून दाखवीत, कथांची कथानके सांगत, त्या सर्वांवर अभिप्राय देत. अशा दोनचार भेटीनंतर कळले, यांचे नाव वसंत पटवर्धन. एव्हाना ध्यानात आले होते की ते कविता लिहितात; मग कळले कथाही लिहितात; मग कळले ते महाराष्ट्र बँकेत काम करतात. दि. बा. मोकाशीच्या कथा हा आमचा आवडींचा आणि चर्चेचा एक विषय. ‘ कुठे असतात हे मोकाशी ? ’ या माझ्या प्रश्नावर पटवर्धनांनी खळखळून हसत मला सांगितले होते, ‘ तुम्ही राहाता त्यांच्या मागच्याच घरात ! ’ आणि त्याच पावली त्यांनी मला मोकाशींच्याकडे नेऊन त्यांच्याशी माझी ओळख करून दिली होती. त्यानंतर आमच्या कितीतरी बैठकी मोकाशींच्या घरीच रंगल्या. हे सर्व असूनही १९५६ नंतर सुमारे पंचवीस वर्षांत पटवर्धनांची व माझी गाठभेट झालीच नाही. मधल्या काळात पटवर्धनांनी बरेच लेखन केले. ‘ छुक छुक छैया ’ हा त्यांचा कथासंग्रह ‘ मेघदूताचे मराठी भाषांतर ’, ‘ आर्य ’ ही चाणक्याच्या कर्तृत्वावर प्रकाश टाकणारी वजनदार कादंबरी अशी त्यांची साहित्याची पुस्तके प्रसिद्ध झाली. त्यातल्या सोन्याचं हरीण व विदेशविनिमय या पुस्तकांना महाराष्ट्र राज्य सरकारची प्रथम पारितोषिके मिळाली. ‘ आर्य ’ कादंबरीला महाराष्ट्र साहित्य परिषदेचे ह. ना. आपटे पारितोषिक प्राप्त झाले तर ‘ अर्थ व्यवस्थापन ’ या ग्रंथाला पुणे विद्यापीठाचे वा. गो. आपटे पारितोषिक देण्यात आले. आणि त्याचबरोबर ‘ विदेशविनिमय ’ ‘ अर्थव्यवस्थापन ’, ‘ ताळेबंद–विवरण व अभ्यास ’ आदी आर्थिक विषयांशी संबंधित अशी पुस्तकेही प्रसिद्ध झाली. बँकांच्या क्षेत्रात डॉ. एम. व्ही. तथा वसंतराव पटवर्धन या नावाला विशेष प्रतिष्ठा प्राप्त होऊन त्या नावाचा दबदबा निर्माण झाला. हे मी दुरुन ऐकले. मात्र पटवर्धनांची माझी पुन्हा भेट झाली ती पंचवीस वर्षांच्या कालावधीनंतर आणि साहित्याच्या संबंधातच; माझ्या

ध्यानात आले की कामे व जबाबदाऱ्या आणि व्यवसायातले मोठेपण यांच्या ओझ्याखाली पटवर्धनांमधला लेखक व कवी नष्ट होऊ शकला नाही. उलट तो कथा, काव्य, कादंबरी अशा अनेक माध्यमांतून सातत्याने प्रकट होत राहिला आहे; आजही नव्या लेखनात रमलेला आहे; बँकेच्या क्षेत्रातला व साहित्याच्या क्षेत्रातला ' अर्थ–व्यवहार ' कुशलतेने सांभाळतो आहे.

आमच्या त्या जुन्या स्नेहाचा पुनर्जन्म योगायोगाने या प्रस्तावनेच्या निमित्ताने व्हावा याचा मला आनंद वाटतो आहे.

—शंकर वैद्य


SARKAR

# गीतमेघ

आपल्या स्वामीचा,
कुबेराचा, शाप एक वर्षा-
साठी भोगीत असलेल्या
एका विरही यक्षाला आठ
महिने संपल्यावर वर्षा-
कालाच्या आधी गिरि-
शिखरावर मेघ दिसला.
त्याचं मन व्याकुळ झालं.
त्या मेघालाच उद्देशून तो
मग म्हणू लागला —

काव्य
शाखा (स्थळ प्रत)

यक्ष :

आषाढाच्या पहिल्या दिवशी अवचित दिसशी मला
म्हणुनिया विनवित मेघा तुला ॥

रामगिरीवर एक यक्ष मी
काळ कंठतो विरही कामी
कसा भोगतो शाप सांगु मी व्यथा जाळते मला

स्वीकारी या कुटजसुमांते
ऐक प्रार्थना प्रसन्नचित्ते
स्वागत करितो प्रीतिवचाने प्रणयी हा पोळला

तुला पाहुनी सुखासीनही
कातर होती, होती विरही
कथा काय मग कंठमिठीचा प्रिय ज्यांचा तुटला

इतरां जरि तू धूम-ज्योती
सलिल वायुची असशिल मूर्ती
दूत प्रियेस्तव मदनपीडिता असेच वाटे मला

तप्तांचा तू असशी आश्रय
इंद्रसचिव तू, तू करुणामय
निरोप माझा घेऊन जाई अलका नगरीला

प्रिया दूर मम तिला भेटशिल
मनी वाटते नाहि न म्हणशिल
विफल विनवणी सुजनी बरवी नको शठां सुफला

कुठला घ्यावा मार्ग प्रथम तो
सांगुनि नंतर निरोप कथितो
दूत होउनी पोचिव माझ्या दु:खी दयितेला

हातामधले हेमवलय हे
सखिविरहाने गळते आहे
पुन्हा पुन्हा मज शाप आठवे धनाधिपे जो दिला

आपलं हेमवलय सांवरत मागं ढकलणाऱ्या यक्षाला जणू कुबेरच आपल्यासमोर उभा राहून शाप देत असल्याचं पुन्हा दिसू लागलं. कुबेर म्हणत होता.

कुबेर :

केलेस पाप यक्षा, त्याच्या फळास भोग
ऋतुचक्र पूर्ण एक साही सखीवियोग ।।

ठावे न काय तुजला मी भक्त शंकराचा
फुटता दिशा सदैव परिपाठ पूजण्याचा
तो देव चंद्रमौळी गौरीश वीतराग

मी आज मंदिरासी पूजावयास गेलो
करपाकळ्या मिटूनी मी कमळ वाहु गेलो
परि पद्मपाकळ्यांना आली करांत जाग

बाहेर ये उडोनि मकरन्द एक काळा
रात्री चुकून होता कमळात बद्ध झाला
मज दंशिले तयाने, जणु तो द्विजिव्ह नाग

त्याच्याकडून कळले रात्रीच तोडिशी तू
कमळे, मला न आला आतापर्यंत किन्तू
कित्येक दिन तुझा हा फसवायचा प्रयोग
सखिची मिठी सुटेना, शरदातल्या पहाटे
जावे कसे खुडाया कमळा, तुलाच वाटे
प्रणयात तू प्रियेच्या होतास पूर्ण दंग

सोडूनिया तिला तू संवत्सरास एक
म्हणुनी इथून जाणे, बघ दूर रामटेक
प्राण्या तुला क्षमा ना, होता असाच योग

कुबेराची शापवाणी संपली
तेव्हा, त्याच्या ध्यानात
आलं, तो भास होता. शाप
मात्र खराच होता आणि तो
रामटेक पर्वतावर प्रत्यक्षात
उभा होता मेघासमोर.
त्या मेघानं आपली विनवणी
मान्य केली आहे हे
समजूनच त्यानं मेघाला
सांगायला सुरुवात केली--

यक्ष :

काय दिसावे ठायी ठायी मार्ग कठिण कापता
सुचवितो असशिल जरि जाणता ।।

किती भेटतिल मेघा सरिता
वाहतील ज्या तुझियाकरिता
त्यांना प्रेमादरे, वागवी जी ज्यांची योग्यता

दिसेल तुजला प्रथम नर्मदा
विंध्य तळाशी विशीर्ण जलदा
जणू गजांगीं कुणी जाहला नक्षीला विरचिता

उग्र तिच्या तू उदका सेवी
जांभुळराई ज्याला अडवी
वन्य गजांच्या मदे येत त्या सुगंध, मादकता

रेवाजल ते घेता पिउनी
तुला न उडविल वारा चुकुनी
संपन्नांना सर्व गौरवित, नच थारा रिक्ता

भेटावी तुज मग वेत्रवती
विदिशा नगरीतुनी वाहती
विषयविलासा पिउनी घेशिल नीर तिचे चाखता

पक्षिमेखला लेउनि दाविल
आवर्ताच्या स्थळी नाभिस्थल
निर्विंध्येचा जाणुन घे तू विभ्रम अडखळता

तीरतरुंची पाने पडली
जलवेणी जिचि बारिक झाली
त्या सिंधूस्तव उपाय योजी, जाइ जये कार्श्यता

चाटुकार जणु प्रणय सुखास्तव
शिप्रावारा तसाच वास्तव
पद्मपरिमले गंधित करितो प्रत्येका भेटता

गंभीरेच्या जळी नीरदा
तुझी पडावी छाया सुखदा
तिचा ओळखुनि कटाक्ष चंचल देउ नको विफलता

नीलजलाचे वसन घसरले
जलवेतांच्या करांत धरले
विवस्त्रजघना अशी सोडुनी जाइ रसिक कोणता

नभगंगेला, चर्मण्वतिला
सरस्वतीला, भागिरथीला
वंदन करुनी जा कैलासा, पथ हा आक्रमिता

आपण सांगितलेल्या मार्गा-
वरून जाताना मेघाला कुठं
कुठं विश्रांती घ्यावी लागणार
आहे याची यक्षाला कल्पना
होती. ते लक्षात घेऊन यक्ष
मेघाला पुढं सांगू लागला—

यक्ष :

श्रमता मार्गी विश्रामांची विसरु नको स्थाने
सांगतो तुज विस्ताराने ॥

आम्रकूट तुज दिसेल ज्यावर फळे पक्व-गौर
पडता छाया तुझी काजळी त्याच्या अग्रावर
धरणिपयोधर त्यास मानतिल अमरांची मिथुने

विझव तयाचा वणवा, मिरविल आनंदे माथी
क्षुद्र मने ही कधी विसरती, उपकारा स्मरती
उच्च कुळांची कथा काय मग मी तुजला सांगणे

दशार्ण देशी नंतर जाशिल, फुलतिल केवडकडे
घरटी करत्या ग्रामखगांनी गजबजतिल झाडे
तुजसह येतिल हंस, रंगतिल श्यामल जंबुवने

उत्कट यौवन दाखवील जो नगरवासियांचे
प्रणयगंध दरवळत गुहांतुन जिथल्या गणिकांचे
नीचैर्गिरिवर विश्रांतीला त्यानंतर थांबणे

जरी लागली तरी करावी तिरकस ती वाट
उत्तरेस, बघ उज्जयिनीच्या सौधांचा घाट
लवता विद्युल्लता चकित जिथ ललनांची लोचने

अवंतीस कर महांकाळस्तव, तू सायंकाळी
आर्द्र गजाजिन पुरवुनि सांबा खुलव चंद्रमौळी
अभय अपर्णा तुज अवलोकिल प्रेम—स्तिमित नयने

बाणवनातिल देव वंदण्या थांब जरा पुढती,
कुरुक्षेत्रावर तिथुनि पुढे हो, जा ब्रह्मावर्ती
दमता जलदा, या स्थानावर शांति तुला लाभणे

हिमालयी जा कनखल शैली, मग कैलासाला,
क्रौंचरंध्र मार्गात बघुनिया, प्यावे मानसजला
नजर टाक तू तिथून अलका बघ आनंदाने

प्रवास संपल्यावर मेघाला अलका दिसणार होती. पण आपल्या आवडीच्या अलका नगरीचं वर्णन करण्याचा आणि तिचं दृश्य मेघासमोर उभं करण्याचा मोह यक्षाला आवरला नाही. तिचं साक्षात दृश्य डोळ्यासमोर यावं म्हणून त्या यक्षानं आणखी साखरपेरणी करायला सुरुवात केली---

यक्ष :

जेथ घुमे मुरज जणू मेघगर्जना
ती अलका वर्णु किती, सांगु तुज घना ॥

सुख होउनि अश्रु जिथे नेत्रि वाहते
वित्तेशा वय न जिथे कधिही वाढते
विरहव्यथा जिथ न प्रीत भांडणाविना

सितमणि सौधावरती फुलत तारका
यक्षांना साथ देत रूपकन्यका
कल्पतरू-फल-मधुच्या करिती सेवना

मंदाकिनि-तीरावर वायु वाहती
मंदारांची छाया ऊन वारती
क्रीडति कन्या त्यास्तव अमर-प्रार्थना

रमणकरी सैल निरी वस्त्र निसटता
रत्नदिवे विझवण्यास चूर्ण फेकिता
वावरती विफल जरी यक्ष अंगना

करि कमळे क्रीडेस्तव, कुंद कुंतली
कोरांटी शिरिषफुले कानि गुंतली
फुलवित तू तो कदंब भांग-शोभना

सदनांतुनि अक्षय धन, अप्सरांसवे
वैश्रवणाचा महिमा गात किति थवे
सुरगणिका उपवनात साथ दे कुणा

कनककमल कानावरले किती गळे
केसांतुनि माळलि ती ढळत किति फुले
अभिसारा मार्ग कुठे सांगती खुणा

गंगेचा दूर जणू शालु होउनी
प्रियकर-अंकी बसली प्रणयिनी कुणी
ती नगरी ओळखशिल सांगण्याविना

अलकेच्या चित्रानंतर यक्षानं मेघांसमोर आपल्या प्रिय पत्नीचं चित्रही रंगवलं. ती अलकेत कशी काळ कंठीत असेल, किती सुकली असेल, मेघ घराजवळ जाईल तेव्हा त्यानं तिला कशी जागी करावी हे सारं मेघाला सांगणं यक्षाला आवश्यक वाटलं होतं. तो सांगू लागला—

यक्ष :

असेल कृश ती मनोव्यथेने, कुशीस वा कलली
कलामात्र जणु उगवतीवरी चंद्रकला उरली ॥

विलास करिता माझ्यासह त्या क्षणभरशा रात्री
विरहामध्ये प्रदीर्घ होतील, अडत अश्रु नेत्री
पुरी न फुलली, पुरी न मिटली, कमळण भूवरली

टाकुनि गजरा गाठ बांधली केसांची त्या दिनी
सोडुनि येता तिला, भेटता सोडिन हातांनी
पुन्हा मीच ती तडतडणारी वेणी विस्कटली

भूषण विरहित, दुःखावेगे तन्वंगी ती प्रिया
थकल्या शरिरा असेल टाकत, सोडुनिया शय्या
पापणिला पापणी तियेची नसेल रे भिडली

कुंतल सारे शुद्ध स्नाने राठ कपोलावर
कोमल अधरा करिता पीडा करिल सखी दूर
जलधारा तव धुउनी टाकिल निद्रा नयनातली

काजळ विरहित कटाक्ष त्यांना केसांचा अडथळा
मद्य त्यागिता असतिल गेले विसरुनी भ्रूलीला
मुक्तामाला मांडीवरती नसेल रे रुळली

तुझ्या तुषारे शीतल वारा, त्याने तिज जागवी
नव्या उमलत्या जातिकळ्यासम येईल मग टवटवी
स्तिमितलोचना असेल जेव्हा खिडकीशी बसली

विजेसहित तू करुनी गर्जना तिजला सांगावे
मित्र सख्याचा तुझ्या असे मी देवर मानावे
ऐकताच ह्या तुझ्या वचाला बसेल सावरली

अलकानगरीच्या वर्णना-
बरोबर विरही यक्षानं मेघाला
आपल्या घराच्या खाणाखुणा
सांगितल्या.आपल्या सखीचं
वर्णन ऐकवलं. आपण ते
बरोबर ध्यानात ठेवलं आहे
याची खात्री यक्षाला पटावी
म्हणून मेघानं गृहाच्या
आणि यक्षपत्नीच्या–त्याच्या
वहिनीच्या–त्या खुणा आपण
जणू बघत आहोत असं
कल्पून यक्षाला सांगितल्या–

मेघ :

तू वर्णिल्या गृहाच्या सखिच्या खुणा मनांत
मी बाळंगीन यक्षा, परि त्या इथे पहात ॥

कल्पद्रुमाकडूनी अलकेत घेत नारी
चरणास रंग, मदिरा नेत्रांत रंगणारी
भेटेन भावजयिला नगरात, त्या घरात

मंदारवृक्ष बाल, फुलता झुके डहाळी
वहिनी तयास माझी पुत्रासमान पाळी
जणु इंद्रचाप दारी, ते दृश्य तोरणात

पाचूत बांधलेली वापीत पायरी ती
जणू पुष्कराज देठीं पद्में सुवर्ण फुलती
क्रीडानगास नीळ जो हेमकर्दळीत

तरु कांत केसराचा मदिरा मुखातही वा
फुलण्या अशोक वृक्ष मागेल पाय डावा
सखिचा तुझ्या दिसेल वासंतिमांडवात

कांता तुझी जयाला तालांत नाचवील
नादांत कंकणांच्या निळकंठ तो दिसेल
ओट्यावरी मण्यांच्या बसण्यास त्यास वेत

मी शंख पद्मचिन्हे दारापुढे बघेन
नसता तुझा निवास वाटेल शांत म्लान
कमळास काय शोभा जंव भास्करास अस्त

अलसात चालणारी पुढती असेल ळीना
नाभी सखोल, व्हावा मृगभास लोचनांना
बिंबाधरा कृशांगी कुंदासमान दात

देवास पूजिता वा पुसण्यास सारिकेला
ठाकेल पिंजऱ्याशी चित्रील प्रतनु तुजला
किंवा असेल वहिनी स्वप्नांत भ्रांतचित्त

मितभाषिणी, जणूं ती विरहात चक्रवाकी
झुरते वियोग सहते उछ्वास दीर्घ टाकी
वाटेल पद्म शिशिरी बदलून रूप घेत

यक्षाने सांगितलेल्या घराच्या आणि सखीच्या वर्णनाच्या खुणा मेघ सांगत होता. त्याच वेळेला विरही यक्ष-पत्नी आपल्या आवडत्या सारिकेला पुनः पुनः विचारत होती. " तू त्यांची प्रिय सारिका आहेस, तुला कल्पना आहे का ग ते मला कशी कल्पित असतील! माझी कुठली रूपं त्यांच्यापुढं येत असतील ? "—

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क.
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

यक्षपत्नी :

प्रिय किती नाथास तू ते सारिके मज माहिती
सांग ह्मणुनि कोणत्या रूपात मज ते पाहती ।।

मोजिते मी उंबऱ्यावर मांडिलेली ही फुले
गणित असते शाप सरण्या दिवस किती गे राहिले
काळ कंठी मी कसा, हे तूच असशील जाणती

कल्पिते या अंतरी मी रोज त्यांना मीलना
दूर जाता प्रियसखा हा एक चाळा स्त्रीमना
नाथ तेथे एकटे, मी या इथे ही एकटी

भिजुनि वीणा होय ओली, अश्रु नयनी दाटता
पुसत ती मी मलिनवसना, गीत त्यांचे गुंफिता
हीच यावी काय त्यांच्या पुढति माझी आकृती

बांधले हे केस सुमने त्यांत नाही माळली
स्नेह नसता राठ झाले, ही नखेही वाढली
कल्पिते मी शाप सरता तेच वेणी बांधती

पूजिते मी देवतांना, विरहकृश त्या चित्रिते
अंग टाकी भूमिवरती, लोचनांना झाकिते
दूत येइल सुखविण्या कुणि शब्द घेऊन संप्रती

आपली दया येऊन मेघानं त्याची विनंती मान्य केली असंच त्या विरहार्त यक्षाला वाटलं. मेघ आपल्या घरी गेला आहे आणि आपला संदेश पत्नीला सांगत आहे असंच त्याला वाटायला लागलं. जणू तो मेघ यक्षाच्या दयितेला सांगत होता—

मेघ :

यक्षमित्र मेघ मी येत दूत होउनी
काय सांगतो सखा ऐक गे सुवासिनी ।।

श्रांत पथिक त्याजला मी घरास आणितो
वेणिमोक्ष साधण्यास उत्सुक तो जाणितो
म्हणुनि करित प्रीतीने मन्द्र स्निग्ध मी ध्वनी

दूर रामगिरिवरी यक्ष काळ कंठितो
तिथुनि तो तुझे प्रथम क्षेमकुशल मागतो
विपदकाळ जेधवा तीच चौकशी जनी

नयनि नीर आणुनी, उगिच श्वास सोडतो
कृश जरी तनू तरी तुज कृशांगि चिंतितो
सर्व मार्ग अडवि दैव वैर परी साधुनी

सखिसमोर सांगणे अशक्य माहिती तुला
वदनि स्पर्शलालसा म्हणुनि कर्णि बोलला
तुजसि खूण धाडली माझिया मुखातुनि

चंद्रम्यात मुख तुझे, बर्हभारिं कुंतला—
कांत पाहतो, कुरंगनेत्रि नजर चंचला
तव कृशांग श्यामला लतेत निरखितो वनी

चार मास संपता शापदिवस संपले
शयन सोडिता सखे शेषशायि आपुले
सोस तोवरी प्रिये विरह नेत्र झाकुनी

मग फुलेल चांदणे शारदीय साजणे
शमवु आंतराभिलाष एवढेच सांगणे
वाढतात विरहिं ते जाणतो तुझा धनी

स्वप्निं मजसि पाहुनी रमविता दुजी कुणी
जागलीस एकदा, छेडिलेस कामिनी
स्फुंदुनी किती मला, स्मर प्रसंग तो मनी

असत्य वदति जन उगा विरह स्नेह आटवी
अभोग प्रीतवस्तुचा प्रेमराशि वाढवी
अविश्वास धरू नको, लोकशब्द ऐकुनी

आपला संदेश मेघानं पोचवल्याची संमती दर्शवली आहे हे यक्ष धरून चालला, आणि त्या अपेक्षेपोटीच त्यानं मग मेघाला आपल्या शुभेच्छा दिल्या, ‘ हे प्रिय मेघा, हे कार्य तू केलंस की आपल्या प्रिय सौदामिनीसह पाहिजे त्या देशाला प्रवास करायला जा. तुझा आणि तुझ्या विजेचा कधीही विरह न होता वर्षाश्रीसह तू सदैव सुखी रहा.

यांतील १, २, ३, ४, ५, ७ व ८ ही गीते दूरदर्शनवर आषाढ शुद्ध प्रतिपदेला, १३ जुलै १९८० रोजी ‘ प्रतिभा आणि प्रतिमा ’ कार्यक्रमांत सादर झाली होती.

संगीत : श्री. जितेंद्र अभिषेकी

गायकवृंद :

( १ ) जितेंद्र अभिषेकी
( २ ) श्री. रामदास कामत
( ३ ) श्री. अजित कडकडे
( ४ ) सौ. आशा खाडिलकर.



**निवेदक :**

कुणी मातला राक्षस, तारक वर मिळता ब्रह्मयाचा
मदोन्मत्त होउनी करितसे छळ साऱ्या जगताचा
पाय आपटुनि स्वरां चढवुनि सदैव तो बोले,
" माझ्याहुनि नच श्रेष्ठ कुणी मी सर्वांना जिंकिले ॥ "

तारक :

कोण मजला जिंकितो, मी सर्व लोकां जिंकिले
चंद्र तारे सूर्य वारे देव सारे वाकले ॥

विसरला क्षय चंद्र आता, कधि न येथे लोपतो
फक्त कमळे फुलविण्याला शक्त रवि ना कोपतो
वरुण झाला अस्त-दीप्ती, पाश त्याने टाकले

यक्षपतिचा हिंसकला मी हस्तगद, यम काजळे
दण्ड त्याचा हीन, हरिच्या वज्र हातातुनि गळे
व्यजन झाला वायु मजस्तव, मरुत-गण मी झांकले

उगिच हुंकारास देतो रुद्र अकरा मस्तकी
मणि शिरींचा दीप करुनी, सेवि मजला वासुकी
मेरुशिखरा, कल्पवृक्षा उपटुनी मी फेकिले

निवेदक :

तारकाचा ताप साहुनि देव ते कंटाळती
शरण जाउनि ब्रह्मदेवा भोग अपुला सांगती

वदत धाता, " फक्त आता एक त्याला जिंकता
पशुपतीचा पुत्र, व्हावी ही कशी पण सांगता

शचिपते तू बोलवी मदनास त्या दे कार्य हे
जाउ दे त्या पार्वती जिथ नीलकंठा सेवताहे "

मदन गेला सोबती होती मधू कांता रती
लावला शर कार्मुकाला मोहवाया पशुपती

हाय पण तो विफल, उघडी नेत्र तिसरा शंकर
भस्म करण्या रतिपतीचे, नाहीसा झाला स्मर

मूर्च्छिता झाली रती कालांतराने जागली
भस्म बघुनी त्या अनंगा साश्रुनयने बोलली

रती :

त्यागता तनू तू प्रिया, मन्मथा, नाथा
राहील रती का धरतीवरती आता ॥

तव गात्रे होती उपमानांचा विषय !
जाहली तयांची दशा, तरी मी अदय
किति स्त्रिया कठिण हे सांगुनि जाइल जगता

तुज नावडते ते कधी न मी आचरिले
जे अप्रिय मज ते तू न मनी आणियले
मग दर्शन–दुर्लभ का रे कारण नसता

' तू सदैव माझ्या मनी ' असे वदलास
वाटते वचन हे होते उपचारास
अन्यथा कसा तू अनंग मी अक्षता ?

घेताच दुजीचे नाव तुला बांधिले
मी सुम-रशनेने, रज वा नेत्री गेले
हे स्मरा, स्मरे का तुज पद्मे ताडिता ?

वारुणी-मदे ज्या नेत्रां लाली येते
ओठांत शब्द वा पाऊलहि अडखळते
ती होईल थट्टा तुजविण प्रमदांकरिता

अपुरेच रंगले होते पाऊल डावे
तरि ओढुनि तुजला नेले निष्ठुर दैवे
ते रंगविण्यास्तव तरी पुन्हा ये कांता

निवेदक

पुष्पधन्व्याला जाळून
गेला श्रीकण्ठ निघून
जाई दुसऱ्या बाजूला
गौरी तपास योजून

उमा कष्टविते देह
कुणी शंकरा कथिले
तिची परीक्षा घ्यावया
विप्ररूपाने ठाकले

सांगू लागले, ‘ अपर्णे
पुरे तप, आता थांब
नको शरीरा झिजवू
तुझ्या योग्य नसे सांब ’

ब्रह्मचारी :

नको वराया नवरा तो तू नागांबरधारी ।
विसर जे वांछितेस गौरी ॥

गळ्यात त्याच्या मस्तकमाळा
स्वभाव दिसतो साधा भोळा
कल्पावी का त्रिलोकांत कुणि असली जोडी तरी

तुझिया हाती रत्नकंकणे
तो तर मिरवी भुजगभूषणे
करांत त्याच्या कर देताना थरथरशिल अंतरी !

वस्त्र रेशमी तुला शोभवी
हस्तिचर्म तो कटिला लावी
अलंकृता तू कोठे, तो तर अलंकारवैरी

मागशील ते तुजला वाहन,
वृद्ध वृषभ हो त्याला भूषण !
तुझ्या पित्याला कसे पटावे, तुजला पटले तरी !

तुझिया गात्री उटी सुगंधित
भस्माचे तो त्रिपुण्ड्र लावित
उमे उधळणे भस्म उचित का तुझ्या उरोजांवरी ?

विरूपाक्ष तो, नयन कपाळी
स्मशान लिहिले त्याच्या भाळी
त्रिलोचना त्या कशी शोभशिल तू त्रिभुवनसुंदरी

निवेदक

रागावुन ती उमा उसळली ऐकुनि वच विप्राचे
दोष वर्णिले होते गुण ते, उत्तर दे तोडीचे
चिडून बोलता अशी पार्वती, निरखित होता देव
तिच्या मनातील प्रीतभावना, वदनावरला भाव

पार्वती :

विप्रदेव, या वचे वदन का विटाळिता ?
श्रम तुझा, भुलेल काय भाषणास गिरिसुता ॥
रत्नकंकणे करांत वा भुजंगवेष्टणे
मजसि सर्व सारखे शंकराविना उणे
करितसे न मी तपा आतपीं अजाणता

दूकुलास पांघरो, गजाजिनास देह वा
शेखरावरी असो शशिकला, कपाल वा
गजारूढ तरिही तो सुरेंद्र त्यास वंदिता !

भस्म जे विराजते पवित्र त्या तनूवरी
देवगणही लावती आपुल्या शिरावरी
अंगराग लाभता तो उमेस धन्यता

विश्वमूर्त देह तो तुम्हा विरूप वाटला
भजेन मी अनेक जन्म मजसि त्या नसे तुला
तप न सोडणार मी प्रकटले जरी स्वतः

निवेदक :

बघुनि प्रीत तिची टाकि विप्रवेष
प्रकट झाला तो स्वरूपी महेश
ह्मणे तिजला हे पुरे देहकष्ट
करुनि तपसाधन मिळवलेस इष्ट ॥

शंकर :

जप तप करुनी नको कष्टवू कृश या कायेस
झालो उमे तुझा दास ॥

मदन जाळिला मी त्या दिवशी
परी मनातुनि मुळी न जाशी
तुझी परीक्षा बघण्या केले कठोर मी त्यास

त्यागिलीस तू कुंतलरचना
जटाभार तरि शोभे वदना
भृंगासह वा शैवालेही शोभा कमळास

केसांमधुनि गळल्या सुमने
तुझी दुखावी तनू अपर्णे
तिला स्थंडिली ठेवुनि निद्रा सुखे घेतलीस

मृणालसम तू कोमलगात्री
तपास करिसी दिवसारात्री
कसा बघू मी. वागविताना तीन लोचनांस

मोजिलेस तू मूल्य तपाने
विकत घेतले स्वये श्रमाने
सुफलित होता क्लेश सर्व हे घेतिल नवतेस

अवचित येता पुढे
तिच्या चंद्रमौळी
शैलकन्येस सुचेना
काय करावे त्यावेळी

पुढे जाऊ न शकली
पाय तिथे न थांबले
हात धरुनी शंकर
तिला विचारू लागले,

‘ किती करावा मी तुझा
अनुनय सांग बाले ?’
असे बोलता पिनाकी
गौरी लाजुनिया बोले,

‘ हाती हात देण्या तुम्ही
आता तातानुज्ञा घ्यावी ’
सांब सप्तर्षींना मग
आज्ञा घेण्यास पाठवी

पुन्हा न हा येणे योग
गिरीशा सांगती देव
होऊ दे गौरीश आता
भोळा सांब सदाशिव

शैलराजा झाला त्यांच्या
गोड स्तुतीने प्रसन्न
गौरी शंकरांचे मग
आपोआप ठरे लग्न

सजे राजधानी सारी
बघण्यासी तो सोहळा
एकटा अनंग मात्र
तिथे नाठवे कुणाला

विवाहानंतर जाती
एकांती शृंगारासाठी
वधूवर दोघे जण
दूर, शंकर-पार्वती

यथाकाल मग त्यांना
श्रेष्ठ पुत्रलाभ झाला
पारावार नुरे तेव्हा
अमरांच्या आनंदाला

राक्षसाचा नाश आता
नकी होणार अटळ
मानुनीया गाती सारे
गीते सानंद मंगल

देव :

कुमारसंभव झाला, आला दिवस उत्सवाचा
जन्मला त्राता देवांचा ॥

कार्तिकेय हा करील पुरते देवांचे कार्य
कुठले संकट ठरो न आता अमरां अनिवार्य
सुरांगनांच्या लेखी दिन हा आनंदाश्रूंचा

ऐरावत गज पुन्हा झुलावा इंद्राच्या दारी
तर्जनीवरी फिरवील चक्रा पुन्हा चक्रधारी
चंद्रभास्करा समय पातला ग्रहण संपण्याचा

वसंत वर्षा शिशिर ग्रीष्म वा शारद हेमंत
क्रम बदलुनिया दैत्या होते सतत सुमे देत
उच्च रवाने तेच सांगतिल सर्वांना नाचा

भग्न-शाख जणु तरू न राहिल कुबेर यापुढती
दिसेल त्याची गदा विराजत उंच उभी हाती
वीची फुटतिल सागरांतरी, फुटेल त्यां वाचा

वरा देऊनी चतुरानन तो त्यावेळी चुकला
गौरी-शंकर-नंदन आता वाचवील एकला
रणांगणाच्या यज्ञी आता होम तारकाचा

आज वाहतो प्रसन्न वारा सर्व दिशा तुष्ट
शंखनाद ये दाहि दिशांतुन होता ते इष्ट
नभी दुमदुमते नाद, नगारे-शंख-चौघड्यांचा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ........
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

'कुमारसंभवा'वर आधारित संगीतिका :

ही संगीतिका दूरदर्शनवर मुंबई केंद्रावर मार्च १९८१ ला खास कार्यक्रम म्हणून सादर झाली.

संगीत : श्री. सुरेश देवळे.

गायकवृन्द :

( १ ) श्री. चंद्रकांत काळे,
( २ ) श्री. श्रीकांत पारगांवकर,
( ३ ) डॉ. वसंतराव देशपांडे,
( ४ ) सौ. वंदना खांडेकर,
( ५ ) श्री. अनिल तांबे,
( ६ ) कु. मीरा पुण्ड,
( ७ ) श्री. पद्माकर कुलकर्णी,
( ८ ) कु. सुवर्णा ( प्रसन्ना ) पटवर्धन.


SARKAR

## सरली न कूजिते, सरली सारी रजनी :

सूत्रधार

रावण वधिला, अयोध्यापुरी रामचन्द्र आले
भवभूतीने तदनंतरचे चरित्र वर्णियले
संस्कृत भाषेमधला आहे अमूल्य तो ठेवा
किती गायिला किती ऐकला तरिही वाटे नवा
कलाकृती ती नव्या पिढीला विदित व्हायला हवी

नटी : मी मनकवडी तुमच्या मनिचे सर्व जाणिले कवी,
ऐकावे पण, नव्या पिढीला
इतका नसतो वेळ आजला
गजबजले हे जग व्यापारी
विसरुनी गेले कलाच सारी
अडचण त्यांची समजुनी घ्यावी
कुठे तरी सुरुवात करावी
एक अंक त्या भवभूतीचा
सांगावा हा ध्यास सखीचा

सूत्रधार : पटले मज सुंदरी
म्हणुनि तू चतुरे प्रिय अंतरी
तुझा नच विरह कधी सोसवे
असाविस सदैव माझ्यासवे.

नटी : जर कां आपण इथे राहिलो तर मग नाटक करील कोण?
प्रीत आपुली जगा माहिती, फुलेल ती तर पडद्यावाचुन

आपण जाऊ पडद्यामागे
रसिकांच्या पडु द्यावी कानी
भवभूतीचा लक्ष्मण करि जी
श्रीरामाला सौम्य विनवणी

लक्ष्मण : आर्य चलावे चित्रे बघण्या रेखियली जी पटी
रेखाकारे, सांगितलेल्या अपुल्या चरितावरती
स्मृति सदनाची उघडुनि ठेवी विविध कवाडे किती
गुंगुनि गेला स्वयेच......

राम : ......मग ती आली कुठवरती ?

लक्ष्मण : वहिनींच्या शुद्धीची अग्नी देत ग्वाही
तिथेच थांबली आहेत चित्रे ही
कशा वेळा येती सती साध्वींवर
बघुनी, कालवे श्रीरामा अंतर

श्रीराम : का उदास होसी, ऐक सांगतो तूते
शुद्धीची जरुरी तीर्थ, वन्हिला नसते
जी शुद्ध जन्मतः त्यांची कसली शुद्धी
परि मर्त्य जगाला इतुकी नसते बुद्धी
तुज कसे सांगणे यज्ञसंभवा सीते
जननिंदा तुजला सदैव लिपटू बघते
जे सदैव जपती जन्मभरी कुलधना
ते शिरसावंद्यच होत त्रिलोकी जना
जी फुले सुगंधित घ्यावी माथ्यावरती
पदतळी न चुरडणे ही विश्वाची रीती
तू तशीच असता का अपवादा करिती
कटु अप्रिय वचने तुझस्तव उच्चारिती

सीता : पुरे विषय तो आता नाथा
चला पाहु या तुमच्या चरिता

देवरा सांग ना, सुरू कुठे होते ते ?
या चित्री, गगनी, कोण उभे स्तवनाते ?

लक्ष्मण : ती जृंभक अस्त्रे, वंदित रामां, वहिनी
रघुकुला लाभली विश्वामित्राकडुनी
परि इथेच जर का रमला जास्ती काळ
उरलेल्या चित्रा पडेल अपुरा वेळ
मी कसे सांगु हे, परी बघावी मिथिला
या चित्री, जेथे वरिलित प्रभुना माला

सीता : सावळे स्निग्ध जणु नीलकमल उमले
असे हे आर्यपुत्र चित्रिले ।।

खण्डिले शिवधनू, शिखंड शिरि हालते
मृदु मांसल देही, मुखमण्डल शोभते
स्तिमित होऊनी सौम्य सुंदरा, ताते अवलोककिले

संस्कार उरकला गोदानाचा नुकता
ठाकले विवाहा चवघे बंधू दिसता
त्यावेळी त्या स्थळी पुन्हा मी आज उभी भासले

राम : कमनीय कंकणा लेवुनि मज सुखविता
प्रत्यक्ष महोत्सव अशा तुझ्या या हाता
गौतम देती हाती तो क्षण पुढ्यात मज वाटले

लक्ष्मण : त्यानंतर पुढती, बघा ही रम्य राजधानी

राम : ती तर सौमित्री, वसे ह्या हृदयाच्या कोंदणी
तात जेधवा हयात होते । नवीन होते विवाहबंधन
माता होत्या वाहत चिंता । सुखद आमुचे सरले ते दिन !

लक्ष्मण : चित्र कुठे ते सुरेख, दुष्ट हे दुजे
मंथरा मध्येच येत, विश्व हो खुजे

राज्यत्याग होत, हाति येत वल्कले
वनवासा जाण्यास्तव पडति पाउले

राम : विषय कशाला सौमित्री तो, बघ हा गुहराजा

सीता : इथेच सजला जटाभार शिरि, प्रसंग हो ताजा

राम : पुण्यशील गंगा ही सतत वाहती
पुनश्च नमित रघुकुला सदैव वंद्य ती

सीता : निरखून का पहाता चित्रात हा प्रदेश ?

राम : विसरेन जानकी मी नच हा प्रसन्न देश ॥
किती त्या सुखदा आठवणी ॥

डोंगरी नद्यांच्या काठावर मैथिली
बघ तपोवने ही, इथल्या वृक्षांखाली
तापसी राह्यचे, तसे राह्यचे सदनी
संयमी, मूठभर धान्य तिथे शिजवुनी

लक्ष्मणे ठेवली योग्य व्यवस्था सारी
या इथे राहिलो सुस्थित शैलावरी
स्मरतसे काय तुज मधुरा गोदावरी
विहरलो जोडिने विपुल तिच्या काठांनी

गालास लावुनी गाल, बिलगुनी बसलो
हळुहळू विनाक्रम गुजगोष्टी बोललो
घालता परस्पर मिठी एक हातानी
सरली न कूजिते, सरली सारी रजनी

लक्ष्मण : पंचवटीमध्ये
आली शूर्पणखा राक्षसी

सीता : आठव त्यांचा नको
मुकले तिथे राघवासी

राम :	नको घाबरुस कोमलगात्री
विरहव्यथा ही केवळ चित्री

सीता :	विसरुनी गेले, मला वाटले खरेच आली घरी
कल्पनेतही उगा निर्मिती दुर्जन दु:खा उरी

लक्ष्मण :	आणि इथे हा मतंगमुनिचा
ऋष्यमूक गिरि बघावयाचा
जनस्थानाच्या वाम बाजुसी
चित्रकुंज तो शबरि तापसी
पद्मसरोवर पम्पानामक...

सीता :	...इथेच झाला राघव शोक
मुक्तकंठ, मी असे ऐकले
शौर्य धैर्य नाथांचे सुटले

लक्ष्मण :	कसे सांगू मी वहिनी तुम्हा काय तिथे जाहले
राघव अश्रूनी नाहले ।।

गालावरुनी धारा वाहत
धरणीवरती कणकण विखरत
मोत्यांचा सर तुटला भासत
नीर ते नयनांतुनि वाहले

आवरला आवेग कितीही
अधर नासिका, स्फुरती दोही
ऊर दाटुनी भर ये देही
लक्ष्या लोकांच्या वेधिले

राम :	वत्स लक्ष्मणा, सांग पुढे मज कुठला आहे गिरी
मोर नाचती कदंब होता कुसुमित ज्याच्यावरी

सीता :	पडता तेथे मूर्च्छा येउन सावरशी नाथा
रंगवली चित्रात नेटकी रेखाकारे कथा

लक्ष्मण : माल्यवान या शैला म्हणती वृक्षांनी गंधित
शिखरी त्याच्या निळासावळा जलद विसावा घेत

याच्याहीनंतर । वानरसेनेच्या
आणिक अपुल्या । अद्भुत कृत्यांच्या
अनेक चित्रांच्या । रेखाटल्या रांगा
बघायच्या त्या का । आपणच सांगा
मला परी भासे । दोघेही थकला
म्हणून विनंती ही । घ्यावे विश्रांतीला

सीता : पंचवटीतील या चित्रांना बघूनिया नाथ
दोहद काही खुळे उपजती, उगिच अंतरात
ह्या प्रसन्न वनराईत, वाटते पुन्हा विहरावे
जान्हवी जळी या पावन, मी सचैल स्नान करावे
वाटते तरी मी भीरु तुम्हास कसे सांगावे
रागवाल तुम्ही नाथा
मी म्हटले जर का आता
आपणही सोडुनि नगरी, मजसवे पुन्हा वनि यावे ।।

कित्येक दिसानंतरचा । लाभेल तुम्हा एकांत ।
मी म्हटले येथे तरिही । प्रभु असता सावधचित्त ।
बदलेल स्थिती ती थोडी
विनविते जरी सखि वेडी
पुरवावी आस सखीची दोहदां तिच्या पुरवावे

राम : अवश्य येईन सखये सीते नको मला सांगणे
मनासारखे तुझ्या कराया आवडेल वागणे ।।

हिचे डोहळे पूर्ण करावे वसिष्ठही सांगती
ज्ञात तुला ते वत्सा, येथुनि जाउनिया पुढती
रथ जाइल जो विनाविलंबे विनाविरोधे वनी
सत्वर करणे सुसज्ज रथ तू तयार हो राणी !

सीता : याक्षणी परी मज निद्रा येत श्रमाने।

राम : मग बिलग मैथिली मजला झोप सुखाने

जरि शयनासाठी इथे न जागा आता
तू ठेव जानकी मम वक्षावर माथा ॥

सदनात वनी वा शैशवात यौवनी
करग्रहण जाहले त्या दिवसापासुनी
आसरा न ज्याचा अन्य कधी ललनेला
घे रामबाहु हा उशी म्हणुन सेवेला ॥

कर टाक तुझा हा सखये माझ्या गळा
जो थकवा, भीती याने घामेजला
तव स्पर्शहि केवळ संमोहन गात्राला

जव क्षणाक्षणाला स्पर्श तुझा होतसे
बधिरुनी इंद्रिया विखार निर्मीतसे
ती मूर्च्छा सुख वा निद्रा नुमजे मला

झोपली जानकी अमृत नेत्रांना ही
जणु चंदनलेपच स्पर्श हिचा या देही
कर हिचा गळा जणु शीतल मुक्तामाला
प्रिय तिचे काय नच, विरह वगळुनी मजला

परि नीरव ही शांतता मोडाया धजतो कोण ?

प्रतिहारी : मी प्रतिहारी राजांचा येतसे क्षमा मागून।

राम : थांब तिथे तू मीच उठुनिया येतो बाहेरी
श्रांत जानकी असे झोपली सुखे आत क्षणभरी,
सांग तुला का अडचण आली, का यावे लागले
या धरणीवर कुणी कुठे का चुकल्यासम वागले

प्रतिहारी : कसे सांगणे काय ऐकले।
क्षमा करा जर माझे चुकले।

रामराज्य या भूवर आले
लोक, दशरथा विसरुन गेले

सुखे नांदते सारे भूतल;
कुजबुज आहे एकच केवळ !
या धरणीवर तिचीच कन्या
आज चर्चिता, कुणी न अन्या

राम : समजलो तियेचे मूळ असे मैथिली !
समजते न, असले फक्त तिच्या का भाली ?

सुरयज्ञामध्ये संभवलेल्या सीते
का कोसळणे तुज पुनश्च दैवाघाते ॥

तू जन्म घेतला पावन पृथ्वी होत
तुज जनकसुकन्ये राघव हो जीवित
झालीस प्रिय सखी महारण्यवासांत
तू तातां प्रिय, तव भापण मित गे होते

होतात तुजमुळे पवित्र चवदा लोक
परि अपवित्रा तू, पुटपुटती का लोक
लाभते नाथपण तुझ्यामुळे या भुवना
परि अनाथ म्हणुनी तुज जाया लागते

परि हे कथावे तुजला कशाला !
जाऊनिया तू वद लक्ष्मणाला,
" प्रजाजनांच्या अनुरंजनास
वैदेहि त्यागील तुझा नरेश "

प्रतिहारी : हुताशनाने तिज शुद्ध केले
गर्भी जिच्या राघवबीज ठेले
सीतेस त्या बोलति दुष्ट कांही
अनार्य रीती न रुचे मला ही

राम : नकोस बोलू असे
सांग रे दुष्ट प्रजाजन कसे ॥

जरि इक्ष्वाकूंचे कूळ तया आवडते
परि निंदेलागी तिथेच कारण घडते
ती अद्भुत शुद्धी दूर जाहली देशी
विश्वसणे तिजवर त्यांना अवघड असे

शैशवापासुनी पालनपोषण केले
राहणे वेगळे सौहार्दे नच झाले
करुनिया बहाणा मी खाटिक होऊनी
गृहमैनेसम तिज मृत्युमुखी देतसे

या क्षणापासुनी मीच तिचा अपराधी
ती मात्र निरागस कुलीन साध्वी साधी
उपयोग न होता ठरलो तिजसि उपाधी
तिजसमोर जाण्या धाष्टर्य न मज होतसे

राम : निघूया प्रतिहारी येथुन
सोडुनी सीतेला आपण
सुटली आज तिची संगत
संपली जिण्यातली रंगत

सीता : निद्रिता स्वप्नांत का हे चित्र दिसते जागते
नाथ गेले सोडुनी का मजसि येथे एकटे ॥

मी विसावा घेत होते घेउनी बाहू उशीला
कळत नाही केधवा तो कर प्रभूंनी काढला
स्वप्न त्यांच्या संगतीचे लोचनी का लोपते

दोहदांची पूर्ति व्हावी हीच आशा मन्मनी
सोबतीला राम असतिल हात हाती घेउनी
संपुनी जाग्यात रात्री, संपु दे ना कूजिते

प्रतिहारी : क्षमा करा, मी अवचित आलो राग नसो देवी
सांगतो तुम्हांस वार्ता नवी ।।

आपण होता निद्रित म्हणुनी प्रभू उठुनि गेले
युवराजांना सिद्ध कराया रथास सांगितले
सवे येत मी दाखविण्या पथ, दाखवीन अटवी

सीता : रथात आले मी । हा तर दोहदपूर्तीक्षण
आज उदरि होते । माझ्या गर्भीचे स्फुरण
वेग नको वाढवू । जाऊ हळूहळू आपण !

प्रणाम करिते मी । येथुनी तपोधनासाठी
आशिर्वच त्यांचे । असावे या सीतेपाठी
नमस्कार माझा । जानकीनाथपाउलांना

अंजलि ही जुळली । वंदण्या साऱ्या थोरजना
दु:ख एक सलते । बरोबर असती नच राघव
संगतीस आता । केवळ पूर्वीचा आठव

कूजिते न सरली । जरी त्या सरल्या रात्री सदा
विरहार्ता सीता । एकटी आज पुन्हा एकदा
एकटी आज पुन्हा एकदा
एकटी आज पुन्हा एकदा ।।

संगीत : आनंद मोडक.

गायकवृंद :

( १ ) श्री. सुधीर फडके,
( २ ) सौ. उत्तरा केळकर,
( ३ ) श्रीकांत पारगावकर,
( ४ ) श्री. राजेंद्र कंदळगावकर,
( ५ ) सौ. अनुराधा मराठे,
( ६ ) श्री. प्रभाकर करंदीकर

## ऋतुचक्र



### वसंत :

वसंत आला वसंत आला वसंत आला ग
नयनमनोहर नवलाईने निसर्ग नटला ग ।।

कुठे उमलली नवथर जाई
तिला मोगरा भुलवुनि जाई
पडे न मागे तिळ वनराई
स्वप्नामधुनी आम्रमंजिरिस हळूच ये जाग

अंतरातली विसरुन भीती
पुनश्च स्मरुनी रती-पार्वती
पुष्पधनू घे अनंग हाती
चंपक देखिल त्या खेळांतिल अपुला घे भाग

असतो कुठला रंग प्रीतीचा
गुलमोहर दर्शवी स्वत:चा
कुठली असते प्रेमा वाचा
कुहू आळवुनि.कोकिळ सांगे ऐका अनुराग



ग्रीष्म :

कधीतरी अग्निदिव्य । करावया जगी लागे ।
चहूबाजूचा पेटता । ग्रीष्म तुह्मा आह्मा सांगे ।।

नसे कोठे तृणपाते । आग ओकते आकाश
नसे सावली आसऱ्या । मन उदास निराश
सुख सावली होऊन । गेली वसंताच्या मागे

भेगा धरेला पडल्या । चिराळली मने सारी
दुःख दबे दाताखाली । दात येताना अधरी
सारे स्नेहाचे प्रेमाचे । तुटुनिया गेले धागे

काही दिवस चांगले । पुढे मागे सदा येती
जुना आठव, प्रतीक्षा । सदा बाळग संगती
जसा वागतो मानव । नियतीही तशी वागे



वर्षा :

आला पाऊस नव्हे नव्हे ग जिवलग आला घरी
अंगावरती आषाढाच्या नव्हे सुखाच्या सरी ॥

मरगळ गेली निघून सगळी मोर लागला नाचू
जळवंतीने उधळून दिधला जिकडे तिकडे पाचू
इंद्रधनूचे रंग खुणावित पलीकडे अंबरी

उदासीनता जळी विरघळे विझला वणवा सारा
उलट्या सुलट्या जलधारांना नाचवि मंथर वारा
टिपऱ्या घेउन जणू नाचवित गोपींना श्रीहरी

उलगडल्या केसांत लागली फिरू सख्याची बोटे
मोहरले मी कणांकणांतून कशास सांगू खोटे
मेघकुंतला वीज-फणीने कुणी नभी विंचरी



शरद :

रजनीगंधा रात्रराणिही अस्फुट उमलत वदे
शरद हा वरद ऋतूंच्या मधे ॥

कापुरगोरे रूप शिवाचे घेऊनिया येता
धवलित ज्योत्स्ना सकल धरेला पूर्णचंद्र फुलता
का नच ध्यावे रूप तयाचे आम्ही हंसुनी मुदे

उदकसंपदा उधळुनि येथे नीरद जाती दुरी
निळवंतीचा हो शिडकावा वरी नभी, अंबरी
गगन मोकळे विहार करण्या विहगा स्वच्छंदे

जरी नेसते वस्त्र भरजरी धरा कुठे वाटे
प्रणयासाठी कुठे प्रियतमा मुक्तवस्त्र होते
सीमोल्लंघन कुणा धुंद करि कुणी धुंद गंधे



हेमंत :

नको वाटतो स्पर्श जलाचा, नको वाटते छाया
हेमंताचे दिवस मजेचे रवि अंगावर घ्याया ॥

दिवस सुगीचे, उपभोगाचे, दक्षिणायनाचे
स्पर्शसुखाचे, नेत्रसुखाचे, हर्षगायनाचे
या दिवसांची वाट लागते आवर्जून बघाया

सुभग वाटतो अग्नी हे तर दिवस देवतांचे
दिवस होतसे ल्हान सुख दे भरभरुनी रात्रींचे
रात्रींचे हे दिवस दिवस हे स्वर्ग वाटण्या दुनिया

या दिवसांचे रंग वेगळे, सूर वेगळे असती
दिवस संपले तरिही चोरुन मनात लपुनी बसती
आठव येता त्यांचा नंतर मंथर होते काया



## शिशिर :

जाणीव हो जरेची वृक्षांवरील पाना
शिशिरास हुंदका ये, ऋतुचक्र संपताना ।।

करुनि जुडी कुठेशी जुळवून हातपाय
वृद्धत्व मानू लागे मृत्यूच मित्र होय
आयुष्य संपल्याची चाहूल लागताना

माघात लांबलेल्या रात्रीत गीत गाते
तारुण्य, यौवनाला बिलगे मिठीत घेते
भासे तिथे न शैत्य, शृंगार रंगताना

पदरास पांघरूनी अंकावरील बाळे
पंखात पापण्यांच्या घेती मिटून डोळे
हिव ना शिवे तयांना अंगाई ऐकताना

हे थांबते न चक्र नाही सदा विनाश
ये पालवी वसंती वृक्षास वल्लरीस
हे सत्य दे दिलासा धरणीस मानवांना



वसंत :

ऋतुराजाचा पृथ्वीवरला पदन्यास पहिला
सांगत सर्वां शिशिर संपला कुसुमाकर आला।
धरेवर वसंत अवतरला ॥

सृजनाचा हा सुरेल गायक
सौंदर्याचा अमोघ सायक
उत्सवमूर्ती अनुपम नायक
आगमनाने त्याच्या प्रियजन उत्सवरत झाला

साद ऐकता पर्णाआडुन
कळ्या उमलती लज्जा येउन
एक डोकवे दुसरी मागुन
जाइजुईंचा शीलवतींचा विभ्रम तो पहिला

तप गिरिजेचे दाखविण्यास्तव
शांतरसाचा दिसण्या उद्‌भव
सुचविण्यास ये मनी मनोभव
फुलला चंपक फुले मोगरा कर्णिकार फुलला

तरुतरुवर चैत्र पालवी
मदनसख्याचे चित्र रंगवी
चैत्रगौरीचा आम्रद्रुमासम मुखेंदु मोहरला

शरद :

तुष्ट झाल्या पुष्कळेचे हे सुखाचे हासणे
रजनिगंधा रूप घेते, रूप घेते चांदणे
न्हाउनी कचपाश कोणी उदविते वा कामिनी
चित्र शरदाचे तसे हे रेखिले जाते मनी ।।

जलद जाती दूर देशी, स्वच्छ होते नभ निळे
वाहते डौलात पाणी नाद करुनी झुळझुळे
सोनसळिचे.वस्त्र पिवळे डुलत की शेतातुनी
चित्र शरदाचे असे हे रेखिले जाते मनी

स्मर शरांचा शरद हा तर, वक्र भुवई त्या धनू
करुनि शरसंधान सजतो विश्वविजयास्तव जणू
सूर्यकांतेलाही केले सहज ज्याने अश्विनी
चित्र शरदाचे असे हे रेखिले जाते मनी

विक्रमाला नाहिं सीमा सांगतो हा यौवनी
जा भराऱ्या घेत क्षितिजावरति पंखा पसरुनी
विहगवृंदा धुंद करितो, धुंद करितो मेदिनी
चित्र शरदाचे असे हे रेखिले जाते मनी

# आशा

कितिही आले वादळवारे तरेल तरिही तरी
पुन्हा प्रज्वलित होइल ज्योती विझून गेली जरी
सुकली तरिही पुन्हा पल्लवित होइल अमृतवेल
नकोस बदलू कधी इरादे, भाग्यच बदलेल

## आजचा दिवस

कशास चिंता उगा उद्याची, दिवस आजचा कशास बुडवा
या घटकेला स्मिते उमलता हवा कशाला मुखडा रडवा
आनंदाची गाणी गावी, नको टाकणे फुका उसासे
मृत्यूपूर्वी कशास मरणे, निघून जावे पडता फासे ॥

## अंतरीचा सल

वाटले मजसी जरी रे मी तुझी होते परी
मानिले नाहीस तू का राजसा सल अंतरी ॥

धावले होते तुझ्यापाठी परी तू मजपुढे
पाठमोरा राहिलासी, मुख न वळता मी कुढे
बळ न होते पावलांना मी मृगी हो बावरी

ध्येय होता हस्तगत तू जिंकिता जे वांछिले
थांबला थोडास तेव्हा वाटले मी गाठले
हाय तेव्हाही न पडली दृष्टि का माझ्यावरी

कुणितरी होती समोरी, खुणविले तुजला तिने
धावुनी पडलास कंठी गुंतली दोन्ही मने
तृषित राहुनि मी तरी पुशिले कशी मी हावरी

तृप्त संसारी तुझ्या तू उणिव नाही लौकिका
जीभ आता ना धजावे प्रश्न करण्या येऊ का
प्रेयसी म्हणुनी तुझी मी घ्यावयासी कर करी

विडा :

हे नागवेलिचे मृदुल मधुरसे पान
केलास विडा तू घालुनि षोडष गुण
परि कात कमी का ह्यांत, कसा रंगे न

तव मनात शंका उगीच.त्यांत न कात
तुज विडा रंगण्या हवा कांत, एकांत ॥

## विष :

तू खालुनि जाता सहज पाहिले वर
जाहली चुकुनिया अपुली नजरानजर
अन् मंथित झाला हृदयाचा सागर

परि प्रीतिसुधा तू गेलिस गे घेउनी
मी आठवणीच्या हलाहलाचा धनी

वत्सलांच्छन :

वक्षावर होते तुझ्या जरी मम लक्ष
मणिमंगळसूत्रा दाखविण्या तू दक्ष
जणु तुवा तुडविल्या प्रीतीची ती साक्ष

तू खुशाल वागिव त्याला तुझिया उरी
मी वत्सलांच्छना मिरविन विष्णूपरी ।।

वडवानल :

गेलीस दूर तू येथुनि कोठे सखे
करुनिया प्रीतिचे स्वप्न मला पारखे
जे स्वप्न हिणवि मज स्वप्नांतच सारखे

का प्रेमसागरी भरे असे मृगजल ?
का विझे न वैफल्याचा वडवानल ?

## प्रहरफुलें :

उमलता उषेचे जपाकुसुम आठवे
ती मांगल्याची मूर्त महागणपती
पण दो प्रहरांचे अर्कपुष्प दाविते
रथ पुरुषार्थाचा कसा धावतो पुढती

फिरविते पाठिचे पोट इकडुनी तिकडे
त्या माध्यान्हीच्या सूर्यफुलाच्या साक्षी
पण सांगुनि जाते संध्येची गुलबाक्षी
नेत्रावर तुळतो कुणी प्रीतिचा पक्षी

कल्हार निशेचे लपुनी पूर्णआड
पदरास पाडिते विखार फुलवी डोळा
या प्रहरफुलांचा रंग बदलता बघुनी
गलबले गोंधळे जीव कुणाचा भोळा

## दुष्ट देवतेस :

भाळणार जर नव्हतीस तर मग भुलविलेस तू कशास निशिदिनी ?
गाळणार जर नव्हतिस अश्रू भिजवलीस का उगा पापणी ?
नव्हता होता पाळायाचा तर मग केला कशा वायदा ?
छळायचे जर होते तुजला छपवुनि झाला काय फायदा ?
भंगवण्याचे ठरवुनि ठेउन रंगवली का होतिस प्रीती ?
मनात होते जाळायाचा पतंग म्हणुनी झालिस ज्योती ?
टाळायाचे नंतर होते तर मग येउन भेटलीस का ?
कळायचे ते उशिरा कळवुनि, असशिल झालिस मनी तुष्ट का ?

REFBK-0023638
REFBK-0023638

## काय झाल्या गप्पा :

निवेदक : ससेनाना कोल्होबाबा काय झाल्या गप्पा ।
कानामध्ये सांगा येऊन हळूच अस्वल अप्पा ॥

विचकू नका दचकू नका लचकू नका उगा ।
तुम्ही नाही बोललात तरी फुटेल तुमचा फुगा ।
प्रत्येकाच्या मनामधला माहीत मला कप्पा

ससा : अस्वल अप्पा मध आणिल कोल्हेबाबा ऊस ।
मी आपला मित्रा ससा करीन विचारपूस ।
गप्पागोष्टी मधला होता हाच पहिला टप्पा

कोल्हा : अप्पा म्हणाले, कोल्होबाबा, तुम्ही दाखवा वाकुल्या ।
मागुन येवुन गुपचुप सर्वा करीन गुदगुल्या ।
ससेनाना तुम्हीच पळा पुढे झपाझपा

अस्वल : माझ्या मागे हळूच या कोल्हा म्हणे कसा ।
काळाकुट्ट तुझा रंग, पांढरा पांढरा ससा ।
सगळे मिळून गाणं म्हणू लप्पा लारा लप्पा

निवेदक : मला कळलं कामामध्ये प्रत्येक होता मागे ।
काही नाही म्हणून तुमच्या हातामध्ये लागे
पोटं गेली खपाटी, सर्वच झालात खप्पा

पळा पळा लौकर तुमचं कणीतरी ऐकेल
काठी घेऊन अप्पा नाना बाबांनाही ठोकेल
मला मात्र नका भिऊ माझ्यामागे लप्पा

ग्रंथ संग्रहालय
२७६५
दा. क्र. २३६३८
काव्य

डॉ. वसंत पटवर्धन हे उत्तम कादंबरीकार, कथालेखक म्हणून जितके प्रसिद्ध आहेत, तितकेच कवी म्हणून ख्यातनाम आहेत. मराठीतील कवींप्रमाणे सतत कविता लिहायला त्यांना व्यावसायिक यशोमंदिराच्या पायऱ्या चढत असताना जमले नाही तरी, " माझ्या जातकुळीचे कवी " असं शिफारसपत्र खासगी रीत्या कविवर्य ग. दि. माडगूळकरांनी त्यांना दिलं होतं.

मेघदूताचं त्यांचं मराठीतलं प्रासादिक भाषांतर, आपल्या प्रस्तावनेनंच प्रसिद्ध व्हावं असा त्यांनी आग्रहही धरला होता. त्यांची दुसरी देखणी आवृत्ती नुकतीच प्रकाशित झाली आहे. पण तिथंच न थांबता, दूरदर्शनसाठी ' गीतमेघ ' ही मराठीतली पहिली गीतमालिका त्यांनी लिहिली व त्याला ख्यातकीर्त पंडित जितेंद्र अभिषेकींनी स्वरसाज चढवला. त्यानंतर कुमार-संभवाची संगीतिका डॉ. वसंतराव देशपांडे आणि अन्य गायक-गायिकांनी दूरदर्शनवर आणली; आणि नभोवाणीवरून दोन वर्षे रामनवमीच्या वेळी उत्तररामचरिताचा पहिला अंक ' सरली न कूजिते ' या नावानं श्री. सुधीर फडके, सौ. उत्तरा केळकर इत्यादींनी सादर केला. दोन ऋतूंवरची गीतंही तशीच दूरदर्शनवर सादर झाली आणि संपूर्ण ऋतूचक्रही आता सादर होत आहे. अनेक कविताही त्यांनी लिहिल्या आहेत. त्यातील काही या चार नाट्याभिनिवेश असलेल्या गीतमालिकांबरोबर गुंफून, हा पंचरंग रसिकांच्या समोर सादर होत आहे.

श्री. शंकर वैद्य यांच्या चिकित्सक कविमनानं त्याचं रसग्रहण करून, या सर्व रंगांचा शिडकावा किती मनोहर आहे ते चित्रित केलं आहे. मुक्तछंदातच जास्त वावरणाऱ्या मराठी कवितेचं हे ' सुवासिनी ' स्वरूप वाचकांना आणि रसिकांना निश्चित मनोहारी वाटेल.

प्रत्येक वाङ्मयप्रकारात पदार्पण करताना डॉ. वसंत पटवर्धन यांनी आपलं प्रभुत्व दाखवलं आहे. कविताक्षेत्रात पुस्तकरूपानं पदार्पण करत असतानाही इथे ते अनुभवास येईल याची खात्री आहे.